follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३२७ सातारा मंगळवार दि.२७ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/- रूपये

# सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुतळा कोसळला

**सिंधुदुर्ग :** कोकणातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा भारतीय नौदलाने उभारलेला पुतळा कोसळल्याची दुर्घटना सोमवारी घडली होती. या घटनेमुळे एकच खळबळ माजली असून राज्य सरकार आणि केंद्र सरकारविरोधात टीकेची झोड उठली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचा पुतळा इतक्या निकृष्ट दर्जाचा कसा उभारला जाऊ शकतो, असा सवाल सामान्य नागरिक विचारत आहेत. मात्र, हा पुतळा भारतीय नौदलाकडून उभारण्यात आल्याचे स्पष्टीकरण राज्य सरकारकडून देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर आता भारतीय नौदलाने एक निवेदन जारी करुन आपली बाजू स्पष्ट केली आहे.



या निवेदनात भारतीय नौदलाकडून सांगण्यात आले आहे की, ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनी सिंधुदुर्गवासियांना अर्पण केलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सोमवारी दुर्दैवीरित्या जे नुकसान झाले त्याविषयी आम्हाला अतीव दु:ख आहे. राज्य सरकार, संबंधित तज्ज्ञमंडळी आणि नौदलातील अधिकाऱ्यांचे पथक तातडीने या दुर्घटनेचे कारण शोधण्यासाठी काम सुरु करेल. ही दुर्दैवी दुर्घटना होती. छत्रपती शिवरायांचा पुतळ्याची दुरुस्ती करुन तो पुन्हा राजकोट किल्ल्यावर लवकरात लवकर बसवला जाईल, असे भारतीय नौदलातर्फे सांगण्यात आले.

### काँग्रेसचे नेते सतेज पाटील राजकोट किल्ल्यावर जाणार

**आमचे प्रेरणास्थान, आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची घटना अतिशय अस्वस्थ करणारी आहे..ज्या महाराजांचे किल्ले आज ३५० वर्षांनीही आपल्याला प्रेरणा देत आहेत त्यांचा पुतळा, तोही पंतप्रधानांनी उद्घाटन केलेला, एक वर्षेही टिकत नाही, हे मनाला पटतच नाही आहे.. आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल या सरकारला किती बेगडी आदर आहे हेच यातून दिसतंय... या सरकार चा निषेध करावा तेवढा कमी आहे... या सर्व घटनेबद्दल आढावा घ्यायला व पुढील दिशा ठरवायला एक शिवप्रेमी म्हणून मी उद्या सकाळी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांसह मालवणात, घटनास्थळी भेट देणार असल्याचे सतेज पाटील यांनी सांगितले होते.**

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, समुद्रातील वेगवान आणि खाऱ्या वाऱ्यांमुळे पुतळ्याचे नुकसान

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांचा ३५ फुटी पुतळा कोसळल्यानंतर या दुर्घटनेचे खापर एकमेकांवर फोडण्याचा उद्योग सुरु झाला आहे. राज्य सरकारने या पुतळ्याची जबाबदारी भारतीय नौदलाची असल्याचे स्पष्ट केले होते. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मालवण पोलीस ठाण्यात जाऊन पुतळ्याची उभारणी करणाऱ्या आणि देखरेख करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर गुन्हा दाखल केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या संपूर्ण कामाची तसेच निगा राखण्याची जबाबदारी ही नौदलाची होती. शिवरायांचा हा पुतळा नौदलाच्या अखत्यारीत येतो, त्यांनीच या पुतळ्याची उभारणी केली होती. यासंदर्भात मेसर्स आर्टीस्ट्री नावाच्या कंत्राटीला काम देण्यात आले होते. जयदीप आपटे हे कंपनीचे प्रोप्रायटर आहेत, तर केतन पाटील स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून काम पाहत होते. समुद्रकिनारी असलेल्या शिवरायांच्या पुतळ्याला गंज लागत असल्याचेही निदर्शनास आले होते. त्यानंतर २० ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागानं पत्र लिहून नौदलाच्या निदर्शनास आणून दिले होते, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले.

# लाडकी बहीण योजनेवरुन आदित्य ठाकरे यांचा सरकारवर हल्लाबोल

**छत्रपती संभाजीनगर :** आम्ही शक्ती कायदा २०२१ मध्ये राज्यपालांकडे पाठवला, त्यांनी केंद्राकडं पाठवला मात्र मंजूर केला नाही. महिलांना शक्ती देणारा कायदा आणला नाही, अन् आता मात्र सरकारनं लाडकी बहीण योजना आणली, अशी टीका ठाकरे गटाचे युवासेना अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी केली. निवडणूक आली की असे खेळ केले जातात. कुठलीही निवडणूक जवळ नसताना उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांना तातडीनं कर्जमाफी दिली. शेतकऱ्यांना मोठी मदत दिल्याची घोषणा केली, मात्र मदतीचे १५ रुपये, २० रुपये आले, असा हल्लाबोलही त्यांनी यावेळी केला.



शेतकऱ्यांना दहशतवादी म्हणाले : आता महिलांना किती मिळणार बघा. या दोन वर्षात महिलांची आठवण नाही आली, आज लाडकी बहीण योजना सरकारने आणली. १० वर्षापूर्वी १५ लाखांवर देऊ बोलत होते, आज दीड हजारावर आले, हे खोटे आहेत. दिल्लीमध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले, त्यांना अतिरेकी म्हणाले. आता म्हणतात आम्ही शेतकऱ्यांच्या सोबत आहोत, असे देखील आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

मशाल उजेड आणेल : जर्मनीमध्ये नौकरी देणार म्हणे, युवकांना काही गुवाहाटी इथे जायचे नाहीये. मात्र माझ्या महाराष्ट्राच्या हक्काचे आम्हाला मिळाले पाहिजे. रोजगार मिळाला पाहिजे, मी हक्कासाठी लढणारंच. मात्र राज्यात सध्या माझा लाडका कॉन्ट्रॅक्टर योजना चालू आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी संत एकनाथ रंग मंदिर इथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात केली. ''अयोध्या सारख्या ठिकाणी हरले, कारण त्यांनी स्थानिकांना डावलले. तिथले पुजारी देखील गुजरातमधून आणण्याचा प्रयत्न आहे. परिक्षांम धील घोटाळे आहेत, कितीवेळा आंदोलन करायचे, एमपीएससी म्हणते आम्ही वेळ बदलणार नाही. ही निवडणूक थोडी आहे, ज्याचा वेळ बदलणार नाही. पोलीस भरतीत लाखो मुले आले, त्यांची सोय नाही. किती जणांना नोकरी मिळेल, कुठे मिळेल, त्यांची व्यवस्था कशी असेल, माहिती नाही. कामगार कायदे बदलायचे आहेत. आपल्या मुलांना रस्त्यावर दगडफेक करण्यासाठी वापरणार आहेत का?'' असा संतप्त प्रश्न उपस्थितीत करत ''या अंधारात मशाल उजेड आणू शकते,'' असे आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नेमका कसा पडला?

### एकनाथ शिंदेंनी सांगितले, म्हणाले ताशी ४५ किमी वेगाने सोसाट्याचा वारा वाहत होता यामुळे पुतळ्याचे नुकसान

**मुंबई :** मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्यामुळे विरोधक आक्रमक झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ४ डिसेंबर २०२३ रोजी या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं होतं. ८ महिन्यातच पुतळा कोसळल्याने आश्चर्य व्यक्त होत असून, कामावर प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहे. महाराजांचा असा अपमान करणाऱ्या मिंधे राजवटीला आणि भाजपा नावाच्या विषारी सापाला आता चेचायलाच हवं अशा शब्दांत आदित्य ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. यादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुतळा नौदलाकडून उभारण्यात आला होता असे सांगितले आहे. तसंच झालेली घटना दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे.



**नेमके काय झाले?**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा कोसळला आहे. हा पुतळा नेमका कशामुळे कोसळला हे मात्र स्पष्ट झालेले नाही.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

''झालेली घटना योग्य नाही, छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. तो पुतळा उभारला तेव्हा त्या कार्यक्रमाला आम्हीसुद्धा होतो. हा पुतळा नौदलाकडून उभारला गेला होता, त्याचं डिझाईन नौदलाने तयार केलं होतं,'' अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

पुढे ते म्हणाले की, ''मी जिल्हाधिकाऱ्यांशी यासंदर्भात बोललो. त्यांनी मला सांगितले की, ताशी ४५ किमी वेगाने सोसाट्याचा वारा वाहत होता. यामुळे पुतळ्याचे नुकसान झाले आहे.

उद्या तिथे नौदलाचे अधिकारी येणार आहेत. पालकमंत्री रवींद्र चव्हाण घटनास्थळी जात आहेत. नौदलाचे अधिकारी आणि आमचे काही अधिकारी पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिमाखात उभा राहील यासाठी उद्या पाहणी करू. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्यदैवत असून हा पुतळा आम्ही तात्काळ उभारू''.

# उद्धव ठाकरेंनी कोणाकडे बोटे करू नये

### प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल

**नाशिक :** युवसेना प्रमुख आदित्य ठाकरे आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या दौऱ्याला भाजपकडून कडाडून विरोध करण्यात आला. रामा हॉटेलबाहेर भाजप आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्ते आमनेसामने आले होते. यावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसंच दिशा सालीयनचे फोटो असणारे पोस्टर घेऊन यावेळी आदित्य ठाकरेंचा निषेध करण्यात आला. यावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी कार्यकर्त्यांना पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला.यावरून आदित्य ठाकरे यांनी आज आमच्या कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज झाला आहे. त्यासाठी मी पोलिसांना दोष देत नाही. त्यांना वरून कुणीतरी आदेश दिला असेल, असे वक्तव्य केले. आता यावरून



वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी नाशिक येथे पत्रकार परिषदेत विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात पण लाठीचार्ज झाला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात पण लाठीचार्ज होत आहे. ठाकरे यांनी कोणाकडे बोटं करू नये. इतरांवर एक बोट करत असताना आपल्याकडे चार बोटे असतात, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.

# तुम्हाला इथे काय झक मारायला ठेवले का?

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे जीएसटी भवन इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांच्या कामाचे वाभाडे काढत या अधिकाऱ्यांना झाप झाप झापले. अजित पवारांना उत्तर देताना अधिकाऱ्यांची भंबेरी उडाली आणि अक्षरश: ततपप झाल्याचे पाहायला मिळाले.



अजित पवारांचा पारा का चढला?

त्याचे झाले असे की, अजित पवार इमारत चढत होते. यावेळी पहिल्याच पायरीवर सिमेंट असल्याने अजित पवार यांच्या निदर्शनास आले. ते पाहून संतापलेल्या उपमुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. हे कशाला झक मारायला ठेवलेय का? हे काय मला काढायला ठेवले आहे का? असा सवाल अजित पवारांनी यावेळी अधिकाऱ्यांना केला. यावेळी अजित पवार चांगलेच संतापल्याचा पाहायला मिळाले.

जीएसटी भवनची पाहणी करताना अजितदादांनी अधिकाऱ्यांना चांगलेच झापले. छाछूगिरी करू नका, ड्रेनेज लाईनचे काम करताना लक्षात नाही आले का तुमच्या? असा सवाल त्यांनी केला. जीएसटी भवनाच्या नव्या इमारतीत ड्रेनेज लाईनचे झाकण वरती आल्यामुळे अजितदादा अधिकाऱ्यांवर भडकले होते. अजित पवार आपल्या कडक स्वभावासाठी ओळखले जातात. कामात निष्काळजीपणा केल्याबद्दल अनेकदा अजित पवारांनी अधिकाऱ्यांना झापले आहे. त्याचीच प्रचिती पुन्हा एकदा आली.

# स्पर्धा परीक्षार्थींना दिलासा राज्य शासनाकडून ते' परिपत्रक रद्द

**पुणे :** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या ज्या परिपत्रकाचे कृषी विभागाने पालन केले नाही म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २५८ पदांचे मागणीपत्र परत पाठवले होते, ते परिपत्रक आता रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे आता कृषी सेवेची पदे राज्यसेवेत समाविष्ट होणार का, परीक्षेचे काय होणार, कधी होणार असे अनेक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

आयपीबीएस परीक्षा आणि महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी २५ ऑगस्ट रोजी होणार असल्याने संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलावी, कृषी विभागातील २५८ पदांची भरतीप्रक्रिया राज्यसेवा परीक्षेतून करावी, अशा मागण्यांसाठी स्पर्धा परीक्षार्थ्यांनी पुण्यात आंदोलन केले होते. त्याला राजकीय वळण मिळाले होते. त्या वेळी महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२४ साठीचे मागणीपत्र २९ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध होईपर्यंत प्राप्त झालेले नव्हते. त्यामुळे कृषी विभागातील २५८ पदांचा राज्यसेवा परीक्षेत समावेश जाहिरातीमध्ये करणे शक्य झाले नाही, असे स्पष्टीकरण एमपीएससीने दिले होते. तसेच २५ ऑगस्टला होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर २० ऑक्टोबर २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे निश्चित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन न केल्याने कृषी विभागाने दिलेले २५८ जागांचे मागणीपत्र एमपीएससीने परत पाठवल्याचे वृत्त लोकसत्ताने प्रसिद्ध केले होते. त्यानंतर आता २० ऑक्टोबर २०२२चे शासन परिपत्रक तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आल्याचे शासन निर्णय राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्ध केला.

२० ऑक्टोबर २०२२चे शासन परिपत्रक काय होते?

एमपीएससीने २०२२ मध्ये स्पर्धा परीक्षांच्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्यसेवेसह सर्व राजपत्रित गट अ आणि गट ब संवर्गासाठी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा या नावाने एकच संयुक्त पूर्वपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. या परीक्षेतील निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या स्वतंत्र मुख्य परीक्षा, मुलाखती घेण्याचे जाहीर करण्यात आले. या पार्श्वभूमीवर, सामान्य प्रशासन विभागाने २० ऑक्टोबर २०२२ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्यानुसार, 'एमपीएससी'ने केलेल्या बदलाच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांनी पदभरतीची परिपूर्ण मागणीपत्रे 'एमपीएससी'ला, सरळ सेवेच्या रिक्त पदांची मागणीपत्रे सप्टेंबरपर्यंत द्यावीत, असे स्पष्ट करण्यात आले होते. पूर्वपरीक्षेसाठी जाहिरात प्रसिद्ध करताना एखाद्या संवर्गाचा, पदाचा समावेश न झाल्यास नंतर कोणत्याही टप्प्यावर तो करता येणार नाही. म्हणजेच, पुढील वर्षीपर्यंत संबंधित पदाची जाहिरात देता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.



# राहुल गांधी ५ रोजी सांगली दौऱ्यावर; पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण

**सांगली :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख नेते ५ सप्टेंबर रोजी कडेगाव येथे स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी येत आहेत. शिक्षक दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती आ. डॉ. विश्वजित कदम यांनी सोमवारी माध्यम प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

डॉ. कदम यांनी सांगितले, स्व. पतंगराव कदम यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळेच त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी शिक्षक दिनाचा मुहूर्त साधण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष खा. शरद पवार, उबाठा शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आदी मान्यवरांसह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आदींसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी स्व. पतंगराव कदम यांचे मूळ गाव असलेल्या सोनसळ येथे उभारण्यात आलेल्या पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार असून यानंतर कडेगावमधील बयाबाई कदम महाविद्यालयाच्या पटांगणात मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास सुमारे दोन ते अडीच लाख लोक उपस्थित राहतील असेही ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांची उपस्थिती असल्याने या निमित्ताने निवडणुक प्रचाराचे रणशिंग कडेगावमध्ये फुंकले जात असल्याचे मानले जात आहे.

# शिरुरमध्ये बिबट्यांचे हल्ले

**शिरुर :** शिरुर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना वाढत असून, ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. जांबूत गावात बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याची, तर कान्हूर मेसाई गावातील ढगे वस्ती परिसरात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक शेतकरी जखमी झाला. बिबट्या पकडण्यासाठी वन विभागाने पिंजरे लावले आहेत.

जांबूत गावात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मुक्ताबाई भाऊ खाडे (वय ५५) यांचा मृत्यू झाला. मुक्ताबाई रविवारी सायंकाळी बेपत्ता झाल्या. खाडे कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी त्यांचा शोध घेतला. मात्र, त्यांचा शोध लागला नाही. या घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली. त्यानंतर वन विभागाने त्यांचा शोध घेतला. सोमवारी दुपारी चारच्या सुमारास मुक्ताबाई यांचा मृतदेह उसाच्या शेतात आढळून आला. खाडे यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे उघडकीस आल्याने जांबूत गावात शोककळा पसरली. शिरुर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावात सोमवारी सकाळी सहाच्या सुमारास पाण्याची मोटार सुरू करण्यासाठी निघालेल्या अंकुश खर्डे (वय ६०) या शेतकऱ्याला बिबट्याने लक्ष्य केले.

# चित्ती नसू द्यावे समाधान!

हेचि थोर भक्ति आवडते देवा।
संकल्पावी माया संसाराची।।
ठेविले अनंते तैसेची राहावे।
चित्ती असो द्यावे समाधान।।
वाहिल्या उद्वेग दु:खची केवळ ।
भोगणे ते फळ संचिताचे ।।
तुका म्हणे घालू तयावरी भार।
वाहू हा संसार देवापायी।।

**संत तुकाराम महाराजांनी समाधानाची व्याख्या केली आहे, ती अलिकडच्या काळातील काही लोकांना लागू होत नाही, असे दिसते. कितीही सुख मिळाले, तरी त्यात समाधान मानायचेच नाही, अशी वृत्ती मध्यमवर्गाची झाली आहे. समाधानी आणि त्यातील नागरिकांचे प्रमाण पाहिले, तर जगातील पाचवी अर्थव्यवस्था असलेल्या भारताचे स्थान फारसे समाधानकारक नाही.**

संत तुकाराम महाराज संसारातील लोकांच्या चिंता कधीच मिटत नाही आणि कितीही मिळाले, तरी मिळवण्याची हौस काही फिटत नाही, असे सांगतात. देशात एकीकडे सामाजिक विषमता वाढत असताना दुसरीकडे संघटित वर्ग मात्र आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी सातत्याने दबाव आणीत असतो.'आहे रे आणि नाही रे' वर्गातील दरी सतत वाढत आहे. महात्मा गांधी सांगत, तळागाळातील आणि पीडित लोकांकडे पाहून धोरणे आखा. त्यांच्या परिस्थितीकडे पाहून आपली परिस्थिती तुलनेने चांगली आहे, त्यात समाधान माना; परंतु आपल्याकडे वरच्या वर्गाकडे पाहून वागण्याची सवय आहे. गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात खासगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांना अनेक ठिकाणी २० हजार रुपयांपेक्षाही कमी पगार मिळत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे समाजातील मोठ्या वर्गाला आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. 'वर्क इंडिया'च्या अहवालानुसार, ५७.६३ टक्के खासगी नोकरांना वीस हजार रुपये किंवा त्याहून कमी पगार आहे. अशा परिस्थितीत या लोकांना किमान वेतनही दिले जात नाही. सुमारे २९.३४ टक्के खासगी नोकऱ्या या मध्यम उत्पन्न गटातील आहेत. यातील वेतन वीस ते ४० हजार रुपये प्रति महिना आहे. या वर्गात मोडणाऱ्यांच्या जीवनात थोडीफार सुधारणा होते; पण त्यांना आरामदायी राहणीमान जगता येत नाही. या श्रेणीत येणारे लोक आपला दैनंदिन खर्च भागवत असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. कमी वेतनाच्या नोकऱ्यांमुळे असमानता निर्माण होत आहे. यामुळे केवळ आर्थिक आव्हानेच नाहीत, तर सामाजिक स्थिरतेवरही नकारात्मक परिणाम होत आहे. एकीकडे अशी स्थिती असताना सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे. महागाईशी निगडीत वेतन मिळायला हवे. सामाजिक सुरक्षितताही हवी; परंतु त्याचबरोबर आपल्यावर काही उत्तरदायित्व आहे, याची जाणीव सरकारी नोकरीतील किती टक्के लोकांना आहे, हा प्रश्नच आहे.

सरकारी नोकरांना वेतन मिळण्याचा हक्क आहे; परंतु निवृत्ती वेतन हा हक्क होऊ शकत नाही. तसा तो द्यायचा असेल, तर मग खासगी नोकऱ्यांतही तो असायला हवा. एखादी योजना संबंधित घटकांचे हीत लक्षात घेऊन केली असेल, तर ती हक्क होत नाही. त्यातही सरकार निवृत्ती वेतन बंद करीत नाही, तर त्यात सुधारणा करीत आहे. निवृत्ती वेतन देताना त्यात कर्मचाऱ्यांचे दहा टक्के योगदान घेताना पूर्वीच्या जुन्या पेन्शन योजनेपेक्षा दहा टक्के जादा निवृत्ती वेतनही द्यायला तयार आहे. त्यामुळे त्यात खरेतर नुकसान काहीच नाही, तरीही कर्मचारी संघटना जुन्या पेन्शन योजनेसाठी आग्रही आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांचा कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि निवृत्ती वेतनावर होणार खर्च पाहता आता विकासकामांसाठी फार पैसा शिल्लक राहत नाही. त्यामुळे कल्याणकारी राज्याची संकल्पना आता धोक्यात येत आहे. वेतन आणि निवृत्ती वेतनाचा खर्च पन्नास टक्क्यांच्या आत असायला हवा; परंतु आता महाराष्ट्रातला खर्च ५८ टक्क्यांहून अधिक आहे, तर केंद्र सरकारचा खर्चही त्याहून अधिक आहे. त्यात वेतन, निवृत्ती वेतन आणि सरकारने काढलेल्या व्याजावरचा खर्च विचारात घेतला, तर आता विकासकामांसाठी तीस टक्क्यांपेक्षाही कमी रक्कम उरते. विरोधी पक्ष जुन्या पेन्शन योजनेचा आग्रह धरीत आहेत. हिमाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा प्रभावी ठरला होता. राजस्थान सरकारने अगोदरच जुनी पेन्शन योजना लागू केली होती. या योजनेबाबत रिझर्व्ह बँकेने चिंता व्यक्त केली होती. २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, राज्यांचा पेन्शन खर्च २०२२-२३ मध्ये १६ टक्क्यांनी वाढून ४,६३,४३६ कोटी रुपये झाला.

जुन्या पेन्शन योजनेत हा खर्च १७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. २०१९-२० मध्ये ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे एकत्रित पेन्शन बिल ३.३८ लाख कोटी रुपये होते. त्याचवेळी पगारावर एकूण ५.४७ लाख कोटी रुपये खर्च झाले. म्हणजे देशभरातील ६१.८२ टक्के पगार एकत्रितपणे पगार व पेन्शनवर खर्च झाला. खर्च वाढल्यामुळे सरकारला इतर आवश्यक कामांसाठी महसूल वापरण्यास कमी वाव आहे.

देशात जुनी पेन्शन योजना आणि नवीन पेन्शन योजना यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने नवीन पेन्शन योजना काढून टाकली आहे आणि त्याच्या जागी एकात्मिक पेन्शन योजना सुरू केली आहे. सरकारने नवीन पेन्शन योजना २००४ साली सुरू केली. या अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना गुंतवणुकीची मंजुरी मिळते, ज्या अंतर्गत ते त्यांच्या संपूर्ण कारकीर्दीत पेन्शन खात्यात नियमित योगदान देऊन त्यांचे पैसे गुंतवू शकतात. एवढेच नाही, तर जेव्हा एखादा कर्मचारी नवीन पेन्शनमध्ये निवृत्त होतो, तेव्हा त्याला पेन्शनच्या रकमेचा काही भाग एकरकमी काढण्याचा पर्याय मिळतो.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला त्याच्या मृत्यूपर्यंत नियमित उत्पन्न मिळते. जर तो मरण पावला, तर संपूर्ण पैसे नॉमिनीकडे जातात. नवीन पेन्शन योजना लागू होऊन वीस वर्षे झाली असली, तरी जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी कर्मचारी आंदोलने करीत आहेत. तज्ज्ञांच्या मते, जुन्या योजनेच्या तुलनेत नवीन पेन्शन योजनेत कर्मचाऱ्यांना खूपच कमी लाभ मिळतात. त्यामुळे त्यांचे भविष्य सुरक्षित नाही. या गोंधळात केंद्र सरकारने 'यूपीएस' म्हणजेच एकात्मिक पेन्शन योजना सुरू केली आहे. ही योजना १ एप्रिल २०२५ पासून देशभरात लागू होणार आहे. 'यूपीएस'ची सर्वात मोठी खास गोष्ट म्हणजे जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सरासरी मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम मिळेल; मात्र यासाठी अनेक मानके आणि नियमही निश्चित करण्यात आले आहेत. एप्रिल २०२३ मध्ये, डॉ. सोमनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. शंभरहून अधिक कर्मचारी संघटना आणि संघटनांशी तपशीलवार सल्लामसलत करण्यात आली. रिझर्व्ह बँकेशी चर्चा झाली. राज्यांचे वित्त सचिव,राजकीय नेतृत्व आणि कर्मचारी संघटनांनी सूचना केल्या. यानंतर समितीने एकात्मिक पेन्शन योजनेची शिफारस केली. 'यूपीएस'चा अवलंब केल्यावर रक्कम निवृत्तीपूर्वीच्या १२ महिन्यांच्या सरासरी मूळ वेतनाच्या ५० टक्के असेल. ही रक्कम २५ वर्षांपर्यंतच्या सेवेनंतरच मिळेल. २५ वर्षांपेक्षा कमी आणि १० वर्षांपेक्षा जास्त सेवांच्या प्रमाणात पेन्शन दिली जाईल. कौटुंबिक पेन्शन कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मृत्यूपूर्वी कुटुंबाला एकूण पेन्शन रकमेच्या ६० टक्के रक्कम मिळेल. किमान पेन्शन किमान १० वर्षांच्या सेवेनंतर, दरमहा किमान दहा हजार रुपये दिली जाईल.

खात्रीशीर पेन्शन, कौटुंबिक निवृत्ती वेतन आणि किमान निवृत्ती वेतन, महागाई निर्देशांक महागाई रिलीफच्या आधारावर उपलब्ध असेल. सेवानिवृत्तीवर ग्रॅच्युइटी व्यतिरिक्त एकरकमी पेमेंट सहा महिन्यांच्या सेवेसाठी १० टक्के (पगार + महागाई भत्ता) एकरकमी पेमेंट असेल. याचा फायदा २३ लाख केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना होणार आहे. सरकारने जुन्या पेन्शन योजनेचा पर्याय बंद केला आहे. नवीन पेन्शन योजना (२००४) आणि एकात्मिक पेन्शन योजनेचा पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य कर्मचाऱ्यांना आहे. एकात्मिक पेन्शन योजनेमुळे सरकारवर सहा हजार आठशे कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. राज्य सरकारेही ही रचना निवडू शकतात. यात राज्य सरकारी कर्मचारी सहभागी झाल्यास ९० लाख कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

केंद्राचे योगदान वाढून १८.५ टक्के झाले आहे. जे कर्मचारी २००४ ते आत्तापर्यंत आणि ३१ मार्च २०२५ पर्यंत निवृत्त होतील, त्यांनाही 'यूपीएस'च्या पाच गुणांचा लाभ घेता येईल. त्यांनाही थकबाकी मिळणार आहे. त्यांना आधीच मिळालेल्या रकमेतून नवीन गणनेनुसार रक्कम समायोजित केली जाईल. दरम्यान, केंद्र सरकारच्या एकात्मिक पेन्शन योजनेला केंद्रीय कर्मचाऱ्यांचा विरोध आहे.'जुनी पेन्शन बहाल करण्याच्या' हमीसाठी त्यांनी पुन्हा गदारोळ करण्याची तयारी सुरू केली आहे. 'ओपीएस'साठी आंदोलन करणाऱ्या केंद्र सरकार आणि विविध राज्यांतील कर्मचारी संघटना लवकरच आपली आगामी रणनीती जाहीर करणार आहेत. सरकारने 'यूपीएस' आणून कर्मचाऱ्यांची फसवणूक केली आहे.

- भागा वरखडे

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळण्यावरून शरद पवार गटाचे भाजपावर टीकास्त्र

**मुंबई :** काही महिन्यांपूर्वीच मालवण येथे स्थापन करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली आहे. हा पुतळा का कोसळला याचं कारण अद्यापही अस्पष्ट आहे. मात्र, या घटनेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटानेही भाजपा सरकारला लक्ष्य केले आहे.

शरद पवार गटाने नेमके काय म्हटले?

शरद पवार गटाने एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. ''पंतप्रधानांच्या प्रसिद्धीचा दिखावा नडला. राजांचा पुतळा नव्हे, महाराष्ट्रधर्म पडला'', असं म्हणत त्यांनी भाजपा सरकारवर टीका केली आहे. ''आपल्या प्रसिद्धीच्या दिखाव्यासाठी वेळ आणि कामाच्या दर्जाला दुय्यम स्थान देणाऱ्या नरेंद्र मोदींच्या नीतीचा राम मंदिर आणि संसद भवनानंतर महाराष्ट्राच्या अस्मितेलाचं फटका बसला आहे. नौदल दिनी पंतप्रधान मोदींच्या हस्ते अनावरण झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळला आहे'', शरद पवार गटाने म्हटले आहे.

**हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे – खासदार सुप्रिया सुळे**

या घटनेवर खासदार सुप्रिया सुळे यांनीही प्रतिक्रिया दिली. देशाचे पंतप्रधान जेंव्हा एखाद्या स्मारकाचे तथा वास्तूचे उद्घाटन करतात, तेंव्हा त्याचे काम दर्जेदारच असेल, याची जनतेला खात्री असते. परंतु सिंधुदुर्गातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वर्षभरातच कोसळला. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे. विशेष म्हणजे या स्मारकाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ४ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. ज्याअर्थी एक वर्षही पूर्ण न होता हा पुतळा कोसळला, त्याअर्थी त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले होते. हे उघड आहे. या अर्थाने ही पंतप्रधानांची आणि जनतेचीदेखील उघड फसवणूक आहे. या पुतळ्याचे काम निकृष्ट दर्जाचे का झाले यासह इतर अनेक गोष्टींची कसून चौकशी होणे गरजेचे आहे, असं त्या म्हणाल्या. दरम्यान, गेल्या वर्षी नौदल दिनानिमित्त मालवण येथे शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला होता. तसेच ४ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आलं होतं. महत्त्वाचे म्हणजे त्यावेळी माजी आमदार परशुराम उपरकर यांच्यासह अनेकांनी या पुतळ्याच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तसेच या कामाच्या चौकशीची मागणी केली होती.

# त्या कॉन्ट्रॅक्टरना जेलमध्ये टाकणार

## मुंबई-गोवा हायवेच्या पाहणीनंतर मुख्यमंत्र्यांचा इशारा

**मुंबई :** गणेशोत्सव आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना मुंबई-गोवा महामार्गाची अवस्था अजूनही तशीच आहे, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या रस्त्याची पाहणी केली. तसंच दिरंगाई करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेशही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

काय म्हणाले मुख्यमंत्री?

'मुंबई-गोवा महामार्गाचं काम गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे, त्यामुळे कोकणवासीयांना नाहक त्रास सहन करावा लागतोय. काही कॉन्ट्रॅक्टर काम घेतात आणि काम सोडून देतात. ज्या कॉन्ट्रॅक्टरने काम केलं नाही, ज्या लोकांचा यामध्ये मृत्यू झाला त्यासाठीही हेच जबाबदार आहेत. या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्ट करून चालणार नाही, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना जेलमध्ये टाकलं पाहिजे. तेव्हाच लोकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार थांबेल', असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

'ज्यांनी दिरंगाई केली त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. कोणाचीही गय करू नका असे अधिकाऱ्यांना सांगितले आहे. गणपतीच्या आगोदर आपण जास्तीत जास्त रस्ता पूर्ण करू. पावसानंतर हे सर्व रस्ते युद्ध पातळीवर वेळेत पूर्ण होतील, यासाठी काम करू', असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

# नाशकात कांद्याने पुन्हा डोळ्यात आणलं पाणी

**नाशिक :** विविध कारणांमुळे कायम चर्चेत असलेला व अचानक भाववाढीमुळे सर्वसामान्यांच्या डोळ्यात पाणी आणणार कांदा पुन्हा एकदा वाढलेल्या किमतीमुळे चर्चेत आला आहे. नाशिकमध्ये रोज साधारण २० ते ३० रुपये विकल्या जाणारा कांदा आज १०० ते १२० रुपये प्रति किलो विकल्या जात आहे.

नाशिकमध्ये एक महिन्यापूर्वी कांद्याची २० ते ३० रुपये प्रति किलो दराने विक्री केली जात होती. मात्र, आज १२० रुपये प्रति किलो दराने किरकोळ विक्री होत आहे. त्यामुळे सर्वसामान्याच्या स्वयंपाक घरातील बजेट चांगलेच बिघडले आहे. कांदा हा चर्चेचा विषय सर्वासाठीच राहिलेला आहे. जर एका महिन्यातच दुप्पट भाव होत असतील तर भविष्यात कांदा खिशाच्या बजेटवर अधिक भार येणार आहे. १९९८ मध्ये केंद्र सरकार पाडण्यास कारणीभूत ठरलेला कांदा दरवर्षीच राष्ट्रीय स्तरावरचा विषय असतो. सरकारने यावर निर्यात शुल्क लावले आहे. ते काढले तर भाव आणखी वाढणार असल्याचे नाशिक येथील कांदा व्यापाऱ्यांनी सांगितले.

त्यामुळे आधीच भडकलेल्या महागाईत आणखी तेल ओतले जाण्याची चिन्हे आहेत. सर्वसामान्य त्यामध्ये होरपळून निघणार आहेत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. किरकोळ विक्रीसाठी वाहतूक खर्च व तसेच कांदा खरेदीनंतर दोन-तीन दिवसांनी १०० किलोमधील किमान दोन-तीन किलो कांदा खराब होतो. त्यामुळे सद्यस्थितीला किरकोळ मार्केटमध्ये १०० रुपये प्रति किलो दराने कांद्याची विक्री होत आहे.

# मुंबई – ठाण्यात लाखमोलाच्या दहीहंड्या



**मुंबई :** मुंबईसह राज्यातील गोविंदा पथके मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज झाली आहेत. 'ढाक्कुमाक्कुम ढाक्कुमाक्कुम', 'गोविंदा रे गोपाळा', 'बोल बजरंग बली की जय' अशा घोषणा देत मानवी मनोऱ्यांचा रोमहर्षक थरार मंगळवार, २७ ऑगस्ट रोजी अनुभवायला मिळणार आहे. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्सवप्रेमींना आकर्षित करण्यासाठी आणि संबंधित मतदारसंघावर वर्चस्व प्रस्तापित करण्यासाठी राजकीय पक्षांनी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले असून लाखो रुपयांच्या बक्षिसांची खैरात केली आहे.

मुंबई शहर, उपनगर, ठाणे व आसपासच्या परिसरातील दहीहंडी उत्सवामध्ये गोविंदा पथकांना लाखोंचे लोणी चाखायला मिळणार असून कोट्यवधींची उलाढाल होणार आहे. तसेच परंपरा व संस्कृती जपण्याच्या उद्देशाने काही गोविंदा पथकांकडून मानवी मनोरा रचनेत देखाव्याचे सादरीकरण करण्यासह सामाजिक संदेश देण्यात येणार आहे. तर महिला गोविंदा पथकांना विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबईसह ठाण्यात मोठ्या स्तरावर दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. विविध ठिकाणी आयोजकांनी लाखो रुपयांच्या बक्षिसांसह बॅन्जो आणि डीजेचीही व्यवस्था केली आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह कलाकारांचीही मांदियाळी अवतरणार आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते व वरळी विधानसभेचे आमदार आदित्य ठाकरे यांना त्यांच्याच मतदारसंघात आव्हान देण्यासाठी यंदाही भाजपतर्फे वरळीतील जांबोरी मैदानात सकाळी १० ते रात्री १० या वेळेत परिवर्तन दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून ३ लाख ३३ हजार ३३३ रुपयांची मानाची दहीहंडी बांधण्यात येणार आहे. तर पाच थरांसाठी ५ हजार, सहा थरांसाठी ७ हजार, ७ थरांसाठी ११ हजार आणि ८ थरांसाठी ५१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. भाजपच्या संतोष पांडे यांनी मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सवाचे आयोजन केले आहे. तर ठाकरे गटाच्या युवा सेनेचे वरळीतील विभाग अधिकारी संकेत सावंत आणि आकर्षिका पाटील यांनी वरळीतील श्रीराम मिल चौकात दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले असून आकर्षक चषकासह एकूण ३ लाख ३३ हजार ३३३ रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहे. तसेच याठिकाणी बॅन्जो आणि डीजेसह सांस्कृतिक कार्यक्रमांचेही सादरीकरण होणार आहे. तर ठाकरे गटाच्या युवा सेनेने दुपारी १२ ते रात्री ८ या वेळेत शिवसेना भवनसमोरील राम गणेश गडकरी चौकात निष्ठा दहीहंडी आयोजित केली आहे.

कुलाब्यात महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष व भाजपचे आमदार ड. राहुल नार्वेकर यांनी पारंपरिक दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले आहे. या दहीहंडी उत्सवात एकूण ११ लाख ११ हजार १११ रुपयांची पारितोषिके आणि आकर्षक चषक देण्यात येणार आहे. तर पाच थरांसाठी २ हजार, सहा थरांसाठी ५ हजार, सात थरांसाठी ७ हजार, आठ थरांसाठी २५ हजार आणि नऊ थर रचणाऱ्या गोविंदा पथकास १ लाख १ रुपये देण्यात येणार आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दक्षिण मुंबई विभाग क्रमांक १२ चे विभागप्रमुख संतोष शिंदे यांनी माजी विभागप्रमुख दिवंगत पांडुरंग सकपाळ यांच्या स्मरणार्थ 'दहीहंडी निष्ठावंतांची २०२४' उत्सवाचे आयोजन केले आहे. या दहीहंडी उत्सवात एकूण ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके देण्यात येणार असून शिवसेना नेते व आमदार आदित्य ठाकरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शिवसेनेच्या गिरगाव शाखेजवळ सकाळी १० ते रात्री १० या वेळेत हा दहीहंडी उत्सव होणार आहे.

शिवडी विधानसभेतर्फे मनसे नेते बाळा नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली काळाचौकीमधील अभ्युद्यनगर येथील शहीद भगतसिंग मैदानात सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मानवी मनोऱ्यांचा रोमहर्षक थरार अनुभवण्यासह या ठिकाणी सांगीतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. विविध गोविंदा पथकांना बक्षीस म्हणून एकूण १२ लाख रुपये देण्यात येणार आहेत. मनसेतर्फे बाळा नांदगावकर यांना शिवडी विधानसभेची अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे. या पार्श्वभूमीवर हा दहीहंडी महोत्सव मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

पर्यावरणपूरक आयडीयलची दहीहंडी

दादरमधील आयडीयलच्या गल्लीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सहकार्याने आयडीयल बुक डेपो, श्री साई दत्त मित्र मंडळ आणि बाबू शेठ पवार व मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणस्नेही दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यंदा श्री साई दत्त मित्र मंडळाचे ५० वे वर्ष आहे. यंदा दहीहंडीसाठी रचलेल्या थरांवर महिला अत्याचाराविरोधातील देखावा सकाळी साडेदहा वाजता सादर होणार आहे. या सादरीकरणातून 'महिला सुरक्षा आणि सन्मान' हा विषय मांडण्यात येणार आहे. तसेच पर्यावरणपूरक सण - उत्सव साजरे कसे करावेत, यासंदर्भात पथनाट्याचे सादरीकरणही होणार आहे. दिव्यांग व अंध बंधू - भगिनींच्या गोविंदा पथकाकडूनही थर रचण्यात येणार आहे. तसेच मालाड पूर्वेकडील शिवसागर गोविंदा पथकाकडून महिला अत्याचाराविरोधातील आणि शिवकालीन मावळ्यांच्या इतिहासावरील देखावे दहीहंडीसाठी रचलेल्या थरांवर सादर केले जातील. या दहीहंडी उत्सवात विविध क्षेत्रातील मान्यवर व मनोरंजनसृष्टीतील कलाकार हजेरी लावणार आहेत.

## प्रथम ९ थर रचणाऱ्या गोविंदा पथकास ११ लाख रुपये

**शिवसेना शिंदे गटाकडून ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ४४ च्या पटांगणात सकाळी १० ते रात्री १० या वेळेत 'संस्कृतीची दहीहंडी - विश्वविक्रमी दहीहंडी २०२४' या दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी महोत्सवात प्रथम येऊन नऊ थर रचणाऱ्या गोविंदा पथकास ११ लाख रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तर त्यानंतर येऊन नऊ थर रचणाऱ्या प्रत्येक गोविंदा पथकास ५ लाख रुपये देण्यात येणार आहे. तसेच पाच थरांसाठी ५ हजार, सहा थरांसाठी १० हजार, सात थरांसाठी १५ हजार, आठ थरांसाठी २५ हजार आणि आकर्षक चषक देण्यात येणार आहे.**

## रुग्णांच्या मदतीसाठी अडीच लाख रुपये

**समाजसेवक भिमराव धुळप आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपविभागप्रमुख यशवंत विचले यांनी मुंबईतील दादरमधील केशवराव दाते मैदानात दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले आहे. या दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांची संख्या ही १०० वरून २५ करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला आहे. तर उर्वरित ७५ गोविंदा पथकांना बक्षीस म्हणून देण्यात येणारी अडीच लाख रुपये इतकी रक्कम गरजू रुग्णांना मदत म्हणून देण्यात येणार आहे. 'अडीच लाख रुपये ही रक्कम थोडी वाटत असली, तरी एक नवा पायंडा आम्ही पाडत आहोत. जर असा निर्णय सर्वच दहीहंडी उत्सव आयोजकांनी घेतल्यास एक चांगले समाजपयोगी कार्य होईल', असे भिमराव धुळप यांनी सांगितले.**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# साळशिरंबेसाठी पाच वर्षात सव्वा कोटींचा निधी

## माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नांतून : गावातील अनेक विकासकामे गेली पूर्णत्वास

**कराड** : कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून साळशिरंबे (ता. कराड) येथील विविध विकासकामांसाठी गेल्या पाच वर्षात १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मिळाला असून, सदरची विकासकामे पूर्ण झाली आहेत. व १७ लाख रुपयांची मंजूर विकासकामे असल्याची माहिती राष्ट्रीय काँग्रेसचे प्रवक्ते तानाजी चवरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

पत्रकात म्हंटले आहे की, विकासाची दृष्टी व समाजाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास असणारे व्यक्तिमत्व म्हणून आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे. त्यांनी मुख्यमंत्री असताना सातारा जिल्ह्यात अनेक विकासकामे आणली. त्याचबरोबर कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी



तब्बल १८ हजार कोटी रुपये आणले.

त्याच धर्तीवर गेल्या पाच वर्षात त्यांनी मतदारसंघावर विकासकामातून आपले बारकाईने लक्ष असल्याची प्रचिती दिली आहे. त्याच अनुषंगाने साळशिरंबे गावातील विकासकामांसाठी १ कोटी २५ लाख रुपये उपलब्ध केले. व त्याद्वारे विकासाची गंगा वाहती ठेवली आहे. याकामी आम्हाला रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील - उंडाळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले असून, कराड दक्षिण राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मनोहर शिंदे, युवा नेते इंद्रजित चव्हाण व स्विय सहाय्यक गजानन आवळकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

गेल्या पाच वर्षात मिळालेल्या निधीतून विष्णु मंदिर चौक, त्रिमूर्ती चौक व बिरोबा मंदिर समोरील रस्ता काँक्रिटीकरण करण्यासाठी १० लाख रुपये, सदाशिव लोहार - गणपती मंदिर समोरील रस्ता ते श्री. गुरव यांच्या घरासमोरील रस्ता व लक्ष्मण शामराव पाटील यांच्या घराकडे जाणारा रस्ता अशा वरच्या दोन गल्लीतील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यासाठी १० लाख रुपये, गावातील अंतर्गत पाण्याची पाईपलाईन करण्यासाठी १० लाख रुपये,

ओढ्याकाठी संरक्षक भिंत व घाट बांधणीसाठी १० लाख रुपये, प्रमोद वहागावकर यांच्या घरापासून अनिल पाटील (मंडप) यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी ५ लाख रुपये, जिल्हा परिषद शाळेत प्रशस्त इमारत बांधण्यासाठी १२ लाख रुपये, पुलापासून गुंडा पाटील यांच्या वाड्यापर्यंतचा रस्ता काँक्रिटीकरणासाठी ७ लाख रुपये, नवीन विहीर व गावातील नळ पाणीपुरवठा पाईपलाईन करणेकामी ३६ लाख रुपये, खुडेवाडी येथील लक्ष्मण खुडे यांच्या घरासमोरील रस्ता व स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी १० लाख रुपये तसेच खुडेवाडी येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करण्यासाठी १५ लाख रुपये अशी १ कोटी २५ लाख रुपयांची कामे पूर्ण झाली आहेत.

तर गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी ७ लाख रुपये व साळशिरंबे - म्हारूगडेवाडी शिवारातील पाणंद रस्ता मुरूमीकरण व खडीकरण करण्यासाठी १० लाख रुपये ही कामे मंजूर झाली आहेत. आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी गावासाठी भरीव निधी दिल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**मुंबई** : द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार स्विकारताना कराड आगाराच्या व्यवस्थापिका शर्मिष्ठा पोळ व इतर

# तांत्रिक अडचणीमुळे प्रथम क्रमांक हुकला : पोळ

## कराड बसस्थानक ब गटात गेल्यामुळे व्दितीय क्रमांकावरच मानावे लागले समाधान

**कराड** : हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानात दोन सर्व्हेक्षणात अ गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावलेल्या कऱ्हाड बसस्थानकाचा २020 चे निकष ग्राह्य धरून ब गटात समावेश केला गेला. त्यामुळे येथील बसस्थानाकाला ब गटात राज्यात व्दितीय क्रमांक मिळाला असून अडीच लाखांच्या बक्षिसावरच समाधान मानावे लागले. नुकताच हा पुरस्कार वरिष्ठ आगार व्यवस्थापिका शर्मिष्ठा पोळ व सहकाऱ्यांनी स्विकारला.

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानात येथील बसस्थानाकाने ब गटात व्दितीय क्रमांक पटकावला. त्याची माहिती आगार व्यवस्थापिका पोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. आगार व्यवस्थापक विक्रम हांडे, सहाय्यक वाहतूक अधिक्षक सागर पांढरपट्टे, वाहतुक निरीक्षक वैभव साळुंखे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक अनिल लटके, वरिष्ठ लिपिक सुरज पाटील, लिपिक प्रमोद पोळ, अमित कोळी, वाहतूक नियंत्रक मन्सूर सुतार, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक समीन शेख, प्रमुख कारागीर शेळके आदी उपस्थित होते. एसटी प्रशासनाच्या माध्यमातून एक मे२०२३ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत राज्यात हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात आले. या काळात एकुण चार सर्व्हेक्षण करण्यात आली. अभियानाच्या निमित्ताने आगारातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बसस्थानक स्वच्छ व सुंदर करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. शहरातील अनेक संस्था, संघटना, व्यापारी व नागरीकांच्या सहकार्यातून लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. त्यामुळेच हे यश मिळाल्याचे शर्मिष्ठा पोळ यांनी सांगीतले. तसेच स्पर्धा संपली असली तरी कराड बसस्थानकाची स्वच्छता व सौंदर्य कायम राखण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी सक्रीय आहेत. पहिल्या सर्व्हेक्षणात २020 मध्ये पाचशेहून कमी फेऱ्या असल्याने कऱ्हाड बसस्थानाकाचा सामावेश ब गटात करण्यात आला.

त्यावेळी ब गटात कऱ्हाड बसस्थानाकाला व्दितीय क्रमांक मिळाला. मात्र २०२३-0२४ या अभियान काळात येथील आगाराच्या ७00 हून अधिक फेऱ्या असल्याने कऱ्हाड आगाराचा अ गटात सामावेश करण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार दुसऱ्या व तिसऱ्या सर्व्हेक्षणात अ गटात येथील बसस्थानाकाला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला. मात्र पुन्हा चौथ्या व अंतिम सर्व्हेक्षणात कऱ्हाड बसस्थानाकाचा ब गटात सामावेश करण्यात आला. त्यामुळे येथील बसस्थानाकाला ब गटात व्दितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

# टिळक हायस्कूलमध्ये पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**कराड** : शालांत परीक्षा मार्च २०२४ मध्ये उत्तुंग यश प्राप्त करणारे विद्यार्थी व लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्याचा कार्यक्रम टिळक हायस्कूलमध्ये नुकताच उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळ, कराडचे संचालक बॅरिस्टर विक्रम कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. स्वागतगीत व ईशस्तवन संगीत शिक्षिका संगीता काणे, तबलावादक मुकुंद किर्लोस्कर व विद्यार्थ्यांनी सादर केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, सत्कार व प्रास्ताविक मुख्याध्यापक गोकूळ अहिरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक शरद शिंदे यांनी करून दिला.विद्यार्थ्यांनी इयत्ता १0 शालांत परीक्षेनंतर विविध कारकीर्दीचे मार्ग चोखळावेत, आधुनिक युगात कारकीर्दीच्या अनेक वाटा उपलब्ध आहेत, योग्य शैक्षणिक समुपदेशकांच्या सल्ल्याने हे मार्ग जाणून घेऊन त्यानुसार आपली कारकीर्द घडवावी असे मार्गदर्शन बॅरिस्टर विक्रम कुलकर्णी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

प्रमुख पाहुण्याच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.पारितोषिक यादी वाचन जीवन थोरात यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष संग्राम माळी यांनी मानले. सुत्रसंचालन मेघना भोसले यांनी केले.

कार्यक्रमास उपमुख्याध्यापक किसन वाघमारे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# कृष्णा हॉस्पिटलमध्ये 'रिपिटेटीव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्रेटीक स्टिम्युलेटर' प्रणाली दाखल

## मानसिक आजारांवरील उपचारांमध्ये ठरणार फायदेशीर : सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच कृष्णा हॉस्पिटलमध्ये ही प्रणाली उपलब्ध

**कराड** : येथील कृष्णा हॉस्पिटलच्या मानसोपचार विभागात 'रिपिटेटीव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्नेटीक स्टिम्युलेटर' ही अत्याधुनिक प्रणाली दाखल झाली आहे. नैराश्य आणि इतर मानसिक आजारांवरील उपचारांमध्ये, या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर फायदेशीर ठरणार आहे.

ग्रामीण भागातील रुग्णांना माफक दरात उच्च वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा हॉस्पिटल नेहमीच प्रयत्नरत राहिले आहे. अलीकडे समाजात बलदत्या जीवनशैलीमुळे नैराश्य आणि ओ.सी.डी. म्हणजेच ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर यासारख्या मानसिक आजारांचे प्रमाण वाढू लागले आहे. ओ.सी.डी. हा गंभीर मानसिक आजार असून, यामध्ये रुग्णाच्या मनात सातत्याने एकाच प्रकारचे विचार येऊ लागतात. यासारख्या आजारांवरील उपचारात 'रिपिटेटीव्ह ट्रान्सक्रॅनियल मॅग्नेटीक स्टिम्युलेटर' ही अत्याधुनिक प्रणाली अधिक फायदेशीर ठरते.



जगभरात वापरले जाणारे आणि यू.एस. फूड ॲन्ड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे मान्यताप्राप्त असलेले रशियन बनावटीचे हे मशिन कृष्णा हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आहे. या अत्याधुनिक मशिनरीमुळे मानसिक आजारांच्या उपचारांत चांगला फरक पडू शकतो. या उपचारात मेंदूच्या विशिष्ट भागांना चुंबकीय पद्धतीने उत्तेजित केले जाते. याचा एक मोठा फायदा असा, की हे उपचार रुग्ण ओपीडीच्या आधारावर घेऊ शकतात आणि घरी अथवा कामाच्या ठिकाणी त्यांचे नियमित कार्य करु शकतात. तरी संबंधित रुग्णांनी कृष्णा हॉस्पिटलमधील मानसोपचार विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच**

- भारतातील काही मोजक्याच हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असणारी ही अत्याधुनिक प्रणाली; सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच कृष्णा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाल्याने या भागातील रुग्णांचा याचा मोठा लाभ होणार आहे. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेमध्ये ही उपचार सेवा पात्र रुग्णांना मोफत उपलब्ध होणार आहे.

# अन्यथा विधानसभेत ६0 टक्के ओबीसी समाज आपला हिसका दाखवेल

## लक्ष्मण हाकेंचा शिंदेंना इशारा

**धाराशिव** : विधानसभा निवडणुका जवळ येत असल्याने राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू करण्यात आला आहे. यावेळी निवडणुकीत मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे. लोकसभा निडणुकीत मनोज जरांगे फॅक्टरचा महायुतीला मोठा फटका बसला. आता ओबीसी आरक्षणाचाही महायुतीला फटका बसण्याची शक्यता आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत इशारा दिला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपण एकट्या मराठा समाजाचे मुख्यमंत्री नसून १२ कोटी जनतेचे मुख्यमंत्री आहात. तुम्ही ओबीसी आरक्षणावर भूमिका स्पष्ट करावी अन्यथा येणाऱ्या विधानसभेत ६0 टक्के ओबीसी समाज आपला हिसका दाखवून देईल असा हल्लाबोल ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केला आहे. जरांगे ना एक आणि ओबीसी समाजाला एक अशा दोन भूमिका मुख्यमंत्री मानत आहेत. तसेच शरद पवार यांनी देखील ओबीसीची जाहीरपणे भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी हाके यांनी केली आहे.

धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर हे कधीच ओबीसी आरक्षणावर आपली भूमिका मांडत नाही. राज्याचे आरोग्य मंत्री आणि या जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत तर मनोज जरांगे यांच्या स्टेजवर कार्यकर्ता म्हणून जातात. तुम्हाला जायचंय तर मंत्रीपदाचा राजीनामा देऊन जा, अशा शब्दात प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी शरद पवार ओमराजे निंबाळकर आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर हल्लाबोल केला आहे. प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वात आज भूम शहरात ओबीसी आरक्षण यात्रा निघाली होती. त्यावेळी त्यांनी ही टीका केली आहे.

### रोड रोमिओंची 'वरात' पोलीस ठाण्याच्या 'दारात'

**कराड** : बदलापूर तेथील लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर कराड पोलिसांनी महिला अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी कठोर कारवाई सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून काल सायंकाळी कराड जवळच्या ओगलेवाडी येथील आत्माराम शाळेच्या परिसरात मुलींची छेडछाड काढणाऱ्या व अश्लील शेरेबाजी करणाऱ्या रोड रोमिओंना कराडचे पोलीस उपाधीक्षक अमोल ठाकूर व निर्भया पथक यांनी चांगलाच धडा शिकवला. उपाधीक्षक अमोल ठाकूर यांनी स्वतः कारवाईत सहभागी होत तेथील टवाळ खोरी करणाऱ्या तरुणांना ताब्यात घेऊन महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये कारवाई केली आहे. पोलिसांच्या या कारवाईचे शैक्षणिक वर्तुळातून व कराड परिसरातील सर्वसामान्य नागरिकांतून कौतुक होत आहे.

बदलापूर येथील शाळकरी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्र हादरला आहे. या घटनेनंतर महाराष्ट्रात सर्वत्रच पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला आहे. सातारा जिल्हा पोलीस अधीकक्षक समीर शेख यांनी जिल्हा पोलीस दलाला जिल्ह्यातील मुली व महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर पावले उचलण्याच्या सूचना केल्या आहेत.

# गिरणा धरण फुल्ल होण्याचा मार्गावर, कुठल्याही क्षणी विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**मालेगाव** : उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण असलेल्या व खान्देशसाठी वरदान ठरलेल्या गिरणा धरणाच्या पाणीसाठ्यात कमालीची वाढ झाली असून धरणातील पाणीसाठा मंगळवारी सकाळी सहा वाजेपर्यंत ८७.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरण १00 टक्के पूर्ण भरण्याच्या मार्गावर असून कोणत्याही क्षणी पाण्यातून विसर्ग सुरु करण्याची शक्यता आहे.

धरणातून कोणत्याही क्षणी पाणी विसर्ग सुरू करण्याची शक्यता असल्याने गिरणा नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सध्या गिरणा धरणात ३५ ते ४0 हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग येत आहे. गिरणा धरणावर अवलंबून असलेल्या मालेगाव नांदगाव चाळीसगाव तसेच ग्रामीण भागाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला तर खान्देश शेती सिंचनासाठी पाणी



मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

गिरणा धरण फुल्ल होण्याचा मार्गावर

गिरणा खोऱ्यात व पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे कसमा पट्ट्यातील धरणे भरलेली असल्याने नांदगाव तालुक्यातील गिरणाडॅम धरणात ३५ हजार ते ४0 हजार क्यूसेक पाणी आवक सुरु आहे. त्यामुळे कुठल्याही क्षणी गिरणा धरण १00 टक्के भरू शकते. यामुळे खबरदारी म्हणून गिरणा नदी काढच्या गावांना सुरक्षितेच्या दृष्टीने नदीपात्रात पाणी सोडण्याचा अगोदर पूर्वसूचना देण्यात याव्यात. सतर्कतेचा इशारा देण्यात यावा, असे पत्र कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभागाने दिले आहे.

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, एरंडोल, धरणगाव, भडगाव, पाचोरा या तालुक्यासह नदीकाठचे गावे गिरणा नदीवर पिण्याच्या व शेतीच्या पाण्यासाठी अवलंबून आहे. गिरणा धरणावर अवलंबून असलेल्या गावांना पाणी टंचाई निर्माण झाली होती. उष्णतेची तीव्र दाहकता लक्षात घेता, या गावांना पिण्याची, पाणीटंचाई जाणू लागली. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत होती. गिरणा धरणातून आवर्तन सोडण्यात यावे, ही मागणी जोर धरू लागली होती. आता चांगला पाऊस बरसला असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला तर खान्देश शेती सिंचनासाठी पाणी मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका, नांदगाव शहर, ५६ खेडी योजना, न्यायडोंगरी तसेच जळगांव जिल्ह्यातील चाळीसगांव, तालुक्यातील गावे व पाचोरा, भडगाव, जीवन प्राधिकरणाच्या दोन योजना एरंडोल तालुक्यातील १५४ गावांच्या पाणीपुरवठा योजना अवलंबून आहे. मागील वर्षी पावसाळा ऋतूत कमी प्रमाणात पाऊस पडला होता. कळवण पट्ट्यातील मोसम नदी खोऱ्यातील पडलेला पावसाने गिरणा धरण जेमतेम ५७ टक्के पर्यंत भरले होते. ५२ वर्षात एकूण १२ वेळा गिरणा धरण भरले आहे. त्यात सलग चार वर्षे ओव्हरफ्लो झाले आहे.

# पाचगणीची श्री घाटजाई पतसंस्था १0 टक्के लाभांश देणार : संस्थापक अध्यक्ष नानासाहेब कासुर्डे

**वाई** : श्री घाटजाई पतसंस्थेने शहरातील सर्वसामान्य घटक, व्यापारी, छोटे मोठे उद्योजक, महिला बचत गट याना आर्थिक सक्षम करून सभासद आणि पांचगणिकरामध्ये आपुलकीच नातं निर्माण केले आहे. संस्थेला संन २०२४ आर्थिक वर्षात २४ लाख रुपये नफा झाला असून यावर्षी सभासदांना १0 टक्के लाभांश देणार असल्याचे प्रतिपादन पांचगणी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष व श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब कासुर्डे यांनी केले.

पाचगणी (ता.महाबळेश्वर) येथील श्री घाटजाई पतसंस्थेच्या १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत श्री. कासुर्डे बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष रमेश खरात, संस्थेचे संचालक तानाजी भिलारे, किरण जानकर, अंजना चौरसिया, प्रतिभा कासुर्डे, विजय कासुर्डे, सूर्यकांत गोळे, अविनाश माने, दिलीप टेके, विजय कांबळे, सचिन वाडकर, दत्तात्रय कळंबे महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष रविकांत बेलोशे आदी मान्यवर उपस्थित होते.

नानासाहेब कासूर्डे पुढे म्हणाले संस्थेवरील निष्ठा, ठेवी आणि कर्ज यावरच कुठलीही संस्था यशस्वी होत असते .घाटजाई पतसंस्थेने अल्पावधीत विश्वासनिय कारभार, पारदर्शक व्यवहार यामुळे सातत्याने अ वर्ग प्राप्त करून सभासदांच्या मनात वेगळा विश्वास निर्माण केला आहे. संस्थेच्या सर्व सभासद व ठेवीदारांनी दाखवलेला विश्वास यापुढेही कायम ठेवावा.

दीप प्रज्वलनाने सभेस प्रारंभ झाला. अहवालवाचंन, नफा तोटापत्रक, जमाखर्चाच्या पत्रकांचे वाचन विक्रम पोरे यांनी केले.

यावेळी कासूर्डे, यशवंत पारठे, नामदेव कारंजकर फिरदोस शेख, कल्याणी कांबळे , विजय कासुर्डे तसेच सभासद उपस्थित होते. स्वागत नानासाहेब कासुर्डे यांनी केले विक्रम पोरे यांनी सूत्रसंचालन केले तर रमेश खरात यांनी आभार मानले.

# माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे निकटवर्तीय व नाटककार जगन्नाथ शिंदे राष्ट्रवादीत डेरेदाखल

**वाई** : माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे निकटवर्तीय आणि पांचगणीतील प्रसिद्ध लेखक जगन्नाथ शिंदे यांनी नुकतेच पुणे येथे शरद पवार यांचे हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे तुतारी आपल्या हाती घेतली. आपल्या अमोघ वक्तृत्वाचा फायदा या निमित्ताने राष्ट्रवादीला होणार आहे.

पुणे येथिल 'निसर्ग' मध्ये झालेल्या कार्यक्रमात हा प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी शरद पवार म्हणाले जगन्नाथ शिंदे यांनी आपल्या लेखनीतून सबंध महाराष्ट्राला वेड लावलं तशाच पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची ध्येय धोरणे जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांच्या अमोघ वाणीचा राष्ट्रवादी काँग्रेसला निश्चित फायदा होईल. ते उत्तम वक्ते असल्याने ते त्यांची भूमिका चोख बजावतील असा विश्वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला.

प्रवेशानंतर बोलताना श्री जगन्नाथ शिंदे म्हणाले तु माझा सांगाती या शरदचंद्र पवारांच्या आत्मवृत्ताने मी भारावून गेलो असून ब्याऐंसी वर्षाच्या योध्याचा जीवनपट वाचून मी प्रभावित झालो. आजच्या काळात तरी राजकारणात एवढा प्रभावशाली नेता नाही, म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात स्वतःहून प्रवेश करीत आहे. त्यांच प्रमाणे निष्ठा म्हणजे काय असते त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आ.शशिकांत शिंदे असून .हा ही आदर्श मला भावला. त्याच्या पाठीशी उभे रहाण्यात मला अभिमान वाटेल. पवार साहेबांनी व्यक्त केलेला आशावाद पूर्ण करण्यासाठी मी सदैव प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले.

# श्री मंगल मारुती मित्र मंडळतर्फे१०० हुन अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**सातारा** : सातारा शहराच्या पश्चिम भागातील सामाजिक कामासाठी प्रसिद्ध असलेले श्री मंगल मारुती मित्र मंडळ यांच्यातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येते.

या उपक्रमा अंतर्गत या वर्षी मंडळ परिसरातील आबासाहेब चिरमुले प्राथमिक शाळा व बापूसाहेब चिपळूणकर मराठी शाळा या शाळातील तसेच अन्य काही विद्यार्थी व विद्यार्थिनींना आवश्यक असणारे सर्व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या शैक्षणिक साहित्याचा सुमारे १०० हुन अधिक विद्यार्थ्यांना वर्षभरातील अभ्यासासाठी मदतीचा लाभ होईल हे साहित्य मिळाल्यावर ते पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.अशा या चांगल्या सुनियोजित कार्यक्रमा साठी उपस्थित असलेल्या बाळासाहेब भाटे यांनी सांगितले की मुलांनी या मदतीतून मिळालेल्या साहित्यातून भरपूर अभ्यास करावा व स्वतः चे आई वडिलांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे व भविष्यात मोठं होऊन अशीच इतर विद्यार्थ्यांना मदत करावी .बापूसाहेब चिपळूणकर शाळेच्या संस्थेचे प्रमुख आनंद गुरव यांनी मंडळा च्या साहित्य वाटप कार्यक्रमातील सातत्या बद्दल गौरवोद्गार काढले .ओंकार बोडस गुरुजी यांनी मुलांना शालेय साहित्यातील कोणतीही कमतरता भासणार नाही व मंडळ वेळोवेळी आवश्यक ती मदत करत असते व यापुढे ही सदैव करत राहील असे सांगितले.मंडळाचे अध्यक्ष उमेश नारकर यांनी मंडळाच्या वर्षभरातील कार्यक्रमांचा आढावा घेतला व या अशा समाज उपयोगी उपक्रमांचे इतर मंडळांनी अनुकरण करावे असे आवाहन केले. नितीन नारकर यांनी विध्यार्थी ना मार्गदर्शन केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच मंडळाच्या एक वही मोलाची या उपक्रमाला अनेक दानशूर व्यक्ती नी मदतीचा हात दिला त्यांचे आभार मानले

या कार्यक्रमा साठी बापूसाहेब चिपळूणकर शाळेचे मुख्याध्यापक संदीप म्हस्के व आबासाहेब चिरमुले शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .तांबे व त्यांचे शिक्षक सहकारी उपस्थित होते .मंडळ युवा विभागाचे प्रमुख मयूर नारकर व ईशान नातू यांनी या कार्यक्रमा चे सुंदर नियोजन केले

या कार्यक्रमास सर्वश्री अशोक काळे , स्वप्निल शहा, अतुल आपटे , गुरुप्रसाद पावसकर सार्थ पंडित व मंडळाचे लहानथोर कार्यकर्ते उपस्थित होते.मंगल मारुती मित्र मंडळ यांच्यातर्फे आबासाहेब चिरमुले प्राथमिक शाळा व बापूसाहेब चिपळूणकर मराठी शाळा या शाळातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना आवश्यक असणारे सर्व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी सातारा जिल्ह्यात उत्साहात साजरी

## मंगळवारी सायंकाळी दहीहंडी फोडून महोत्सवाची सांगता

**सातारा** : संततधार ,जोरदार पावसामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रावण महिन्यातील वद्य अष्टमी अर्थात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या उत्साहात आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी सातारा जिल्ह्यात संपन्न झाला.


यावर्षी आलेल्या तिसरा श्रावणी सोमवार आणि श्रीकृष्ण जन्माष्टमी चे औचित्य राखून अनेक कृष्ण भक्तांनी तसेच शिवभक्तांनी उपवासाचे व्रत केले. सोमवारी रात्री बारा वाजता श्रीकृष्णाच्या जन्माचे कथन करत ..भगवान गोपाल कृष्ण की जय, राधे, राधे,.. जय श्री कृष्ण ..अशा मोठ्या घोषणा देत हा भगवान श्रीकृष्णाचा जन्म सोहळा शेकडो कृष्ण भक्तांनी मोठ्या उत्साहात साजरा केला .

दरम्यान ,सातारा शहरातील यादोगोपाळ पेठेतील गोल मारुती मंदिरा नजीकच्या श्री दिवशीकर बंधूंच्या श्री मुरलीधर मंदिरात या जन्मोत्सवानिमित्त तीन दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सायंकाळी श्री रामकृष्ण सेवा मंडळाचे भक्तांनी श्री शाम नाम संकीर्तन तसेच कृष्ण पदांचे गायन केले. तत्पूर्वी सायंकाळी शंकराचार्य मठातील वेदमूर्ती गोविंदशास्त्री जोशी व त्यांच्या अकरा ब्रह्मावृंदांनी मंत्र जागर पठण केले.

सोमवारी सकाळी जन्माष्टमी निमित्त वेदमूर्ती माधव शास्त्री भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनपर पौरोहित्याखाली दिवशीकर परिवारातील बाळासाहेब ऊर्फ श्रीकांत दिवशीकर ,सुनित दिवशीकर, संदीप दिवशीकर,स्वानंद दिवशीकर,सुमेध दिवशीकर तसेच दिवशीकर परिवारातील सदस्यांच्या हस्ते विधिवत श्रीकृष्णाची महापूजा करण्यात आली .

यावेळी पवमान पंचसूक्तचा अभिषेक करण्यात आला .मंदिरातील भव्य अशा संगमरवरी मूर्तीला आकर्षक भरजरी पोशाख घालण्यात आला होता. तसेच सुवासिक चाफा ,गुलाब, शेवंती,





( छायाः अतुल देशपांडे सातारा)

मोगरा, निशिगंध आदी फुलांचे हार आणि विशेष करून देवाला आवडणारी तुळस मोठ्या प्रमाणात अर्पण करण्यात आली होती.

मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई करून विविध रंगातील पडदे व फुलांच्या माळांनी भक्तांचे लक्ष वेधून घेतले जात होते .मंदिराच्या प्रांगणात काढलेली माखन चोर बालकृष्णाची विविध रंगातील देखणी रांगोळी ही तितकीच लक्ष वेधून घेणारी ठरत होती. दिवसभर श्रीकृष्ण भजने, भावगीते ,भक्ती गीते तसेच नामवंत गायकांनी गायलेल्या गीतांचा यावेळी परिसरात सुरू असलेला नामघोष वातावरणात अधिकच धार्मिकतेचे रूप आणत होता .सकाळपासूनच या मंदिरात सातारा शहर परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती .

रात्री ११ वाजता वेदमूर्ती माधवशास्त्री भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकृष्णाचे मूर्तीला विष्णुसहस्त्रनाम म्हणत तुलसी दल अर्पण करण्यात आले .त्यानंतर रात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्णाची जन्मकथा वर्णन करत.. भगवान गोपाल कृष्ण की जय, मुरलीधर की जय ,जय श्रीकृष्ण.. असा मोठ्या आवाजात घोषणा देत उपस्थित कृष्ण भक्तांनी हा जन्मोत्सव साजरा केला .त्यानंतर रात्री विविध मिठाई, खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवून महाआरती करण्यात आली. सर्वांना सुंठवडा तसेच प्रसादाचे वितरण करण्यात आले .

मंगळवारी सायंकाळी दहीहंडी फोडून काल्याचे कीर्तन होऊन या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

सातारा शहरातील मेढा रस्त्यावरील हमदाबाज येथील इस्कॉन संघाचे वतीने ही मंदिरात जन्माष्टमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

करंजे परिसरातील श्री महानुभाव मठात भव्य श्रीकृष्ण मूर्तीला अतिशय सुरेख सजवण्यात आले होते.

## अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा** : अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी एका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहर परिसरात राहणाऱ्या मुलीचा ती शिकत असलेल्या कॉलेजच्या परिसरात दि. १४ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास विनयभंग केल्याप्रकरणी यश रमेश डांगरे रा. संभाजीनगर, सातारा याच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ओलेकर करीत आहेत.

## राहत्या घरातून युवती बेपत्ता

**सातारा** : राहत्या घरातून एक युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २२ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सातारा शहर परिसरात राहणारी एक युवती घरात कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वाघ करीत आहेत.

## सुमारे दहा लाखांच्या फसवणूक प्रकरणी अज्ञातावर गुन्हा

**सातारा** : सुमारे दहा लाखांच्या फसवणूक प्रकरणी अज्ञातावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १६ मे रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास प्रणती उमेश पटवर्धन रा. शाहूनगर, सातारा यांना अज्ञात इसमाने फोन करून पटवर्धन यांच्या बँकेचा क्सेस घेऊन बँक खात्यात असलेल्या प्री एप्रूव्हड लोन फॅसिलिटी मधून पटवर्धन यांच्या खात्यावर दहा लाख रुपये लोन मंजूर करून घेऊन हे पैसे चुकून आले असल्याचे खोटे सांगून ते पैसे स्वतःच्या खात्यावर घेतले आहेत. अशाप्रकारे त्याने पटवर्धन यांची ९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सावंजी करीत आहेत.

## ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांसह ग्रामसेवकाची दुचाकी चोरीला

**खंडाळा** : तालुक्यातील कण्हेरी,कर्नवडी गावच्या ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांसह दुचाकी चोरीस गेली असून खंडाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेली माहिती अशी की,महेश बबनराव देशमुख ( वय-५२ ) हे ग्रामसेवक म्हणून गेली एक वर्ष कण्हेरी, कर्नवडी येथे कार्यरत आहेत.सध्या रा.वाई येथील असून मुळ रा खंडाळा ता खंडाळा या ठिकाणचे आहेत. दरम्यान,दि. २३ ऑगस्ट रोजी सायं. ६ वाजण्याच्या सुमारास महेश देशमुख यांच्या मालकीची होन्डा शाईन कंपनीची दुचाकी क्र. एम.एच.११ डि.जी. ५९२१ ही गीतासागर हॉटेल समोर लावुन देशमुख हे तेथे असलेले सिक्युरीटी गार्ड संजय रघुनाथ गाढवे यांच्याबरोबर बोलत उभे होते.दहा ते पंधरा मिनिटानंतर ते गाडी लावलेल्या ठिकाणी आले. तेव्हा त्या ठिकाणी दुचाकी दिसली नाही.

## वीज वितरण कंपनीचां भोंगळ कारभार

**मायणी** : गारळेवाडी ता.खटाव येथे एक महिन्यापासून खांबावरील विद्युत तारा काढून एरियल बंच टाकण्याचे काम सुरु आहे.हे कामं अत्यंत संत गतीने चालू आसून या संदर्भात वारंवार उप अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मायणी यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करुन ही सदर काम आजतागायत पुर्ण झाले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा वीज वितरण कंपनीचां भोंगळ कारभार समोर आला आहे.

सद्यस्थितीला रस्त्याच्या कडेला एक विजेचा खांब उभा असल्याने वारंवार अपघात होतं असतात तो खांब काढून पाच ते सहा फूट सारुन घेण्यासाठी ग्रामपंचायतीने निवेदन दिले असून आज तागायत या बाबत कोणतीही दखल घेण्यात आली नाही.

सदर एरियल बंच टाकण्याचे काम चालू असल्याने गावातील सर्व स्टेट लाईट बंद आहेत त्यामुळे चोरी होण्याची शक्यता दाट आहे. सध्या परिसरात चोरट्याच्या भेटीचे वातावरण असल्यामुळे गावात वीज नसल्यामुळे लोकांच्यात भीतीचे वातावरण आहे याची दखल घेऊन संबंधित वीज वितरण कंपनीने लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे अशी अपेक्षा ग्रामस्थांच्याकडून होत आहे.

याबाबत सरपंच धनंजय रामचंद्र गारळे व युवा कार्याध्यक्ष संतोष(बाबुराव) मारुती गारळे यांनी वारंवार वीज वितरण कडे या गोष्टीचा पाठपुरावा केला असून संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालावे अशी मागणी सरपंच व ग्रामस्थ करीत आहेत.

# आरोपीला शिक्षेसाठी न्यायालयात पुरावे देणार : समीर शेख

सातारा : मुळची साताऱ्यात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणात सर्व पुरावे गोळा करून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा करावी, अशी मागणी न्यायालयाकडे करणार असल्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकार परिषद सांगितले. दरम्यान, पीडित मुलीची ओळख पटवण्याचे कृत्य कोणत्याही प्लॅटफॉर्मवर अथवा सोशल मीडियावर निदर्शनास आल्यास संबंधितावर तातडीने गुन्हे दाखल केले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

समीर शेख म्हणाले, पीडित मुलगी मूळची साताऱ्यात राहणारी असून काही महिन्यांपूर्वी ती कुटुंबियांसह गोंदवले येथे राहण्यास गेले आहेत. ते त्यांच्या नातेवाईकांसह तेथे राहत होती. सदर मुलगा यांची ओळख हि जुनी आहे. मागीलवर्षी सातारा शहर पोलीस ठाण्यात या मुलावर अपहरची केस दाखल करण्यात आली आहे. त्यात कलम वाढ करून या आरोपीस अटक करण्यात आले होती तर तो तीन महिने जेलमध्ये होता. त्यानंतर तो बाहेर आल्यानंतरही त्याचा संपर्क तुटला नव्हता. मात्र, त्यानंतर अनेकवेळा त्यांच्यात वादावादीचे प्रकार घडले असल्याचे तपासात दिसत आहे. पीडित मुलगी हि मोठ्या प्रमाणात तणावाखाली असल्याने तिने हा टोकाचा पाऊल उचलत आत्महत्या केली आहे. त्यात तिचा मृत्यू झाला. मात्र, रात्रीच त्या मुलाचा



शोध घेऊन त्याला अटक केली असून त्याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला न्यायालयात हजर करून जास्तीत-जास्त पोलीस कोठडी घेऊन सगळे पुरावे एकत्र करून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, याची मागणी न्यायालयाकडे करणार आहे.

तणावपूर्व परिस्थितीवर बोलताना समीर शेख म्हणाले, पीडित मुलीच्या कुटुंबियांना पोलिसांना आतापर्यंत सहकार्य केले आहे. त्यांना दु:ख झाले असल्याने काही गोष्टीबाबत चर्चा करायची होती ती चर्चा त्यांच्यासोबत झाली आहे. तपासातील सर्व बारकावे समजून सांगण्यात आले असून त्यात ते समाधानी आहेत. तपासात सहकार्य केले असून भविष्यात त्यांनी सहकार्य करतीलच असे त्यांनी सांगितले.

सोशल मीडियावर काही पोस्ट फिरत आहेत त्याप्रश्नावर शेख म्हणाले, जर कोणत्याही प्लॅटफॉर्मवर अथवा सोशल मीडियावर पीडिताचा फोटो वापरण्यात आला किंवा नाव जाहीर करण्यात आले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# पारगावनजीक पोटपाटाला भगदाड, हजारो लिटर पाणी वाया

**खंडाळा** : पारगाव ( ता.खंडाळा ) गावच्या हद्दीतून जाणाऱ्या धोम - बलकडी कालव्याच्या पोटपाटाला भगदाड पडल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले.तर या पाण्यामुळे शिवारातील पिकांचे नुकसान झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, खंडाळा तालुक्यातून धोम - बलकवडी कालवा जातो.या कालव्याला जोडून तालुक्यातील असवली खिंडीतून अजनूज,पारगाव येथून अकरा नंबरचा पोटकालवा डोंगराच्याकडेने महामार्गाच्या दिशेनी प्रवाही होता.शुक्रवारपासून सुरू असणारा मुसळधार पाऊस आणि भराव खचून शेरी नावाच्या शिवारातील पोटपाटाचा भराव खचून भगदाड पडले . या पोटकालव्यातून पाणी सुरु होते. तो फुटल्यामुळे हजारो लिटर पाणी



वाया गेले. शिवारातील सखल भागात काही ठिकाणी पाणी साठले,तर नजीक असणाऱ्या ओढ्याच्या पाणी पातळीत वाढ झाली असल्याचे पाहायला मिळाले. तसेच पारगावच्या पश्चिमेला असणारा हा पोट कालवा फुटल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

पोटकालवा फुटला त्या ठिकाणीच यापूर्वीही त्यास भगदाड पडले होते.हा पोटकालवा असवली खिंडीतून डोंगराच्या बाजुने अजनुज, पारगांव शिवारातुन महामार्ग ओलांडताना बावडा हद्दीत भुमिगत पाईपा लाईनद्वारे जातो. मात्र फुटलेल्या ठिकाणापासून पुढे जाताना पुरेसा उतार न राखल्याने या ठिकाणी पाण्याचा फुगवटा निर्माण होतो. गेले दोन दिवस कोसळणारा मुसळधार पाऊस , कालव्यातून पुर्ण क्षमतेने वाहणारे पाणी , त्यात डोंगर उतारावरून पावसाचे वाहणारे पाणी यामुळे भराव खचून पोटकालव्यास भगदाड पडल्याचे दिसून येते.

# शाळानी नियमांचे पालन करावे अन्यथा कारवाई : सपोनि पवार

**वाई** : विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक शाळांनी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यापासून त्याच्या फुटेजची नियमित तपासणी, कंत्राटी कर्मचार्यांच्या नियुक्तीपूर्वी पार्श्वभूमीची काटेकोर पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जी शाळा या नियमांचे पालन करणार नाही त्या शाळांवर आम्ही रीतसर कारवाई करणार असल्याचे प्रतिपादन पाचगणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिलीप पवार यांनी केले.

बदलापूर येथील शाळेत चिमुरडींवरील अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर पोलीस व शालेय शिक्षण विभाग 'ॲक्शन मोड'वर आला आहे. या पार्श्वभूमीवर पांचगणी शहरातील सुमारे ४५ शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक यांची बैठक पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती यावेळी सपोनी पवार बोलत होते. यावेळी पोलिस उपनिरीक्षक रुपाली काळे, पोलिस सब इन्स्पेक्टर बालाजी सोनावणे तसेच निर्भया पथकाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

अलीकडे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीवर मोठी जबाबदारी आली असून शासनाने घालून दिलेल्या नियमांबाबत कुचराई झाल्यास त्या शाळेवर कारवाई करण्यात येणार आहे. पाचगणी हे जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र असल्याने आपली छोटीशी चूक शहराच्या नावाला बट्टा लाऊ शकते याची दखल सर्वांनी घ्यावे असे सांगून सपोनी श्री पवार पुढे म्हणाले पांचगणी मध्ये बऱ्याच इंग्रजी माध्यमाच्या शाळा ह्या निवासी असून या प्रशासनानी विद्यार्थ्यांमधील संवादाची दरी कमी करावी असेही सांगितले.

# उत्तर कोरेगावात पिके कुजली : पावसाच्या पुनरागमानाने पिकाला फटका

आसनगाव : कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागात पावसाच्या पुनरागमनाने पिके कुजण्यास सुरूवात झाली आहे. सततच्या पावसामुळे पिकाला मोठा फटका बसला असून परीसरातील शेतकरी वर्ग धास्तावला आहे. सततच्या पावसामुळे परीसरात सगळीकडेच पाणीच पाणी झाले असून नाले,ओढे,तलाव ओव्हरफ्लो झाले आहेत. प्रामुख्खाने उत्तर कोरेगावात घेवडा,सोयाबीन, वाटाणा, भुईमूग या हंगामात हि पिके घेतली जातात. उत्तर कोरेगाव हा भाग दुष्काळी भागामध्ये गणला जातो गतवर्षी पावसाने दडी मारल्याने ओढे नाले तलाव कोरडेठाक होते. मात्र यावर्षी पावसाने उत्तर कोरेगाव परीसर जलमय करून टाकला.आताच्या घडीला पावसाच्या पुनरागमाने शेतकर्यांच्या हातात आलेली पिके गेली असून संततधार पावसामुळे शेतात खचाखच पाणी साठत असून शेतातील पिके कुजत आहेत. तसेच ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगराईचे प्रमाण देखील वाढत आहे. या पिकांवर बळीराजाचे पुढील अर्थकारण चालत असते मात्र आताच्या घडीला सततच्या पडणार्या पावसामुळे पिके कुजत असून पिकांवर रोगराईचे प्रमाण देखील वाढत आहे परीणामी पिकांची उत्पादनक्षमता कमी होणार असून उत्पादन घटणार आहे.या नुकसानीमुळे पुढील अर्थकारण कोलमडणार असल्याच्या प्रतिक्रिया शेतकरी वर्गाकडून व्यक्त केल्या जात आहेत.



**सततच्या पावसामुळे शेतात अशाप्रकारे पाणीच पाणी होत आहे ( छायाः शुभम गुरव)**

**सततच्या पावसामुळे पिके रोगराईला बळी पडत आहेत.**

**सततच्या पावसामुळे हातातोंडाला आलेल्या पिकांवर बुरशी,करपा,अळींचा प्रादुर्भाव वाढत असून पिकांचे मोठे नुकसान होत आहे. ढगाळ वातावरण व पावसामुळे घेवडा,वाटाणा सह बागायती पिके मोठ्या प्रमाणावर रोगराईला बळी पडत असल्याचे चित्र परीसरात दिसून येते आहे.**